माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये प्राप्त झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १७/२०२३

**तक्रारकर्ता, श्री.सुभाष किसन कुटे,**
**रा.निजामपुर, पो.रिसोड, ता.रिसोड, जि.वाशिम**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., कार्यालय, रिसोड, ता.रिसोड, जि.वाशिम**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. कार्यालय, रिसोड, ता.रिसोड, जि.वाशिम**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १५.०२.२०२४**

**तक्रारकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : अनुपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित**

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| १७.०६.२०२२ | -- | १८.०१.२०२३ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नूसार द्वितीय अपील क्र.३४२०/२०१८ दि.१७.०६.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानूसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १५.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानूसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. उत्तरवादी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नूसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र.३४२०/२०१८) मध्ये दिनांक १७.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून "अर्जदार यांनी मागणी केलेली नाव निहाय माहिती ज.मा.अ. यांनी अर्जदारास २१ दिवसात विनामुल्य पुरवावी व तसा अहवाल आयोगास पुढील तारखेस सादर करावा. माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत लेखी कारणे/स्पष्टीकरण ज.मा.अ. यांनी पुढील तारखेस सादर करावे" असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता श्री.कुटे यांनी दाखल केलेला तक्रार क्र.१७/२०२३ यात द्वितीय अपील क्र. ३४२०/२०१८ यात दि.१७.०६.२०२२ रोजी सुनावणी होवून तात्काळ माहिती प्रदान करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसेच माहिती देण्यास झालेल्या विलंबाबत लेखी कारणे व स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर करण्याचे निर्देश जारी करण्यात आले होते. त्याही सुनावणीस

सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

प्राधिकरणाच्या वतीने कोणी हजर नसल्याचे आढळून येते. याविरुध्द श्री.कुटे यांनी दि.१८.०१.२०२३, दि.०४.०८.२०२२, दि.१५.०९.२०२२ व १६.०१.२०२३ रोजी तक्रार अर्ज दिले असून आयोगाचे आदेशानंतरही त्याची अंमलबजावणी झाले नसल्याचे यात नमूद केले असून संबंधितावर शास्ती लादण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी दि.१७.०६.२०२२ रोजीच्या सुनावणीत आयोगाने स्वयंस्पष्ट आदेश पारित केले असून अर्जदारास २१ दिवसात माहिती पुरविण्याचे तसेच झालेल्या विलंबाबत लेखी कारणे सादर करण्याबाबत सूस्पष्ट आदेश जारी केले होते व दि.०४.०८.२०२२ रोजी पुढील सूनावणी निर्गमित केली होती मात्र वरील आदेशाची अंमलबजावणी झाली असल्याबाबतचा खुलासा सादर करण्याबाबत कुठलीच कागदपत्रे आयोगाचे कार्यालयात प्राप्त झाली नसून, याबाबतीत तक्रारकर्ता यांचे प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने दि.१०.०७.२०२३ दि.११.०८.२०२३ दि.२२.१०.२०२३ व दि.०३.११.२०२३, २९.०१.२०२४ व ०१.०२.२०२४ इतक्या सुनावणी सूचना अनुपालन अहवाल सादर करण्याविषयीच्या सूचना तसेच या आधिच्या सूनावणीस अनुपस्थित राहिल्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे दि.०१.१२.२०१५ च्या परिपत्रकानूसार कार्यवाही का करु नये? याबाबतची विचारणा केली असल्याचे आढळून येते. तथापि, अद्यापही अनुपालन अहवाल अप्राप्त आहे तसेच तक्रारकर्ता यांना कुठलीच माहिती प्राप्त झाली नसून वारंवार संधी दिल्यानंतरही जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित यांनी तक्रारकर्त्यास कुठलीच माहिती प्रदान न करणे व पारित केलेले आदेशाची अंमलबजावणी न करणे ही गंभीर बाब असून, विद्यमान जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित यांनी आयोगाच्या दि.१७.०६.२०२२ रोजीच्या आदेशात नमूद निर्देशाचे तब्बल दिड वर्ष म्हणजे १८ महिने पालन न करणे ही अतिशय गंभीर बाब असून कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचविस हजार फक्त) इतकी शास्ती कार्यवाही करण्यात येते. वरील शास्तीची रक्कम हि त्यांच्या पुढील पगारातून सक्तीने वसूल करुन चलानद्वारे शासकिय कोषागारात योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी. तसेच तक्रारकर्ता यांना वरील आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत माहिती प्रदान करण्याचे निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : १५.०२.२०२४**
जावक क्रमांक 3200 दिनांक 07 MAY 2024